ARTHA
(Fortnightly)
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३८ पुणे, बुधवार, ६ डिसेंबर, १९७२ अंक ११


## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा
## असा बेत चालला असेल
## ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव
## योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.


शेतकऱ्याच्या समृध्दीतील
विश्वसनीय सहकारी
शेतीला मनाजोगा पाणीपुरवठा करण्यासाठीं शेतात किर्लोस्कर पंपसेट बसविला की भरघोस पीक पदरांत पडणारच किर्लोस्कर पंप विनासायास दीर्घकाल काम देतो. तो चालविण्यास कमी खर्च येतो आणि म्हणून त्याची किंमत लवकर वसूल होते किर्लोस्कर आसिआ स्टार्टर पंपसेटचे खात्रीपूर्वक रक्षण करतात. आणि म्हणूनच जाणते शेतकरी किर्लोस्कर पंपसेटची निवड करतात
वैशिष्ट्ये :
• चालविण्यास सुलभ • विजेचा खर्च कमी
• मजबूत बांधणी म्हणून दुरुस्तीचा खर्च कमी
• सुटे भाग त्वरित उपलब्ध
• विक्रीपूर्व व विक्रीनंतरची सेवा.
'किर्लोस्कर-आसिआ' स्टार्टर
अधिक माहितीसाठी लिहा—
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ६ डिसेंबर, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## अमेरिकन तज्ज्ञांची संख्या कमी झाली

अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या वेळी अशी माहिती दिली की सध्या देशातील विकास कार्यात मदत करणाऱ्या अमेरिकन तज्ज्ञांची संख्या २९ आहे. १९७२ च्या एप्रिल अखेर त्यांची संख्या ९२ होती. पुढील वर्षाच्या मे अखेरीस आणखी ९ तज्ज्ञ भारत सोडून जातील. उरलेल्या २० तज्ज्ञांची ३० जून १९७३ पर्यंत जरूर लागणार आहे. भारताने स्वावलंबी अर्थव्यवस्थेच्या बाबतीत प्रगती केली आहे. शिवाय परदेशी मदत आणि सहकार्य ह्या बाबी निवडक क्षेत्रातच मर्यादित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारत व अमेरिका ह्यांनी परस्पर समजुतीने असा निर्णय घेतला आहे की ३० सप्टेंबर १९७२ नंतर अमेरिकेकडून मदतीसाठी आलेल्या तज्ज्ञांची संख्या फक्त सहा विकास कार्यापुरतीच मर्यादित करावी. त्यापैकी दोन प्रकल्प पुढच्या वर्षाच्या जानेवारी आणि एप्रिलमध्ये बंद होणार आहेत. उरलेली कामे ३० जून, १९७३ पर्यंत चालू ठेवण्यात येणार आहेत. ह्या वर्षाच्या ऑक्टोबर अखेरपर्यंत भारतात काम करणाऱ्या शांति-स्वयंसेवकांची संख्या १४२ होती. हे स्वयंसेवक १२ राज्यांतून काम करीत होते. मध्यप्रदेश आणि पंजाब ह्या राज्यांत सर्वात अधिक म्हणजे प्रत्येकी २२ स्वयंसेवक काम करीत होते. आंध्र प्रदेशात १९ आणि राजस्थानात १८ होते. इतर आठ राज्यातील स्वयंसेवकांची संख्या २ पासून १५ पर्यंत होती. हे शांतिसैनिक देशाच्या हिताला बाधक अशा कारवाया करतात व म्हणून त्यांना काढून नेण्यात यावे असा आग्रह काही राज्यांनी धरल्याचे वृत्त होते. परंतु श्री. चव्हाण ह्यांनी ह्या वृत्ताचा इन्कार केला.

## इलेक्ट्रॉनिक मालाचे निर्यातीसाठी संस्करण

मुंबईत सांताक्रूझ विमानतळाजवळ इलेक्ट्रॉनिक्सशी संबंधित मालाच्या निर्यातीसाठी संस्करण करण्यासाठी एक विभाग स्थापन करण्यास मध्यवर्ती सरकारने मान्यता दिली आहे. ह्या औद्योगिक विभागात फक्त निर्यातीसाठी तयार करण्यात येणाऱ्या मालावर जरूर ती प्रक्रिया करण्यात येईल. भारत सरकारच्या परदेश व्यापार खात्याचे मंत्री श्री. ललित नारायण मिश्रा ह्यांनी मुंबई येथे एका परिसंवादाचे उद्‌घाटन करताना ही घोषणा केली. ते म्हणाले की, अशाच प्रकारचे आणखी चारपाच प्रक्रिया विभाग देशात स्थापन करण्याचा विचार चालू आहे. येत्या तीनचार वर्षांत इलेक्ट्रॉनिक्स मालाच्या निर्यातीचे उद्दिष्ट ७५ कोटी रुपयांचे ठरविण्यात आले आहे. ह्यापैकी बहुतेक मालावरील प्रक्रिया सांताक्रूझ येथील विभागातच करण्यात येईल. भारतामधील इलेक्ट्रॉनिक्सच्या धंद्याचा पाया आणि विविधता ही दोन्ही मोठी आहेत. ह्या बाबतीत आशिआत जपानचा पहिला व भारताचा दुसरा क्रमांक लागतो. १९६१ ते १९६५ ह्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक्सच्या मालाचे उत्पादन सुमारे ३० कोटी रुपयांच्या जवळपास होते. ते आता म्हणजे १९७०–७१ मध्ये ८० कोटी रुपयांपर्यंत वाढलेले आहे. त्याचप्रमाणे ह्या मालाच्या उत्पादनाच्या खर्चातही बचत झालेली आहे. १९६५-६६ च्या मानाने उत्पादनाचा खर्च दोन तृतियांशाने कमी झालेला आहे. ह्या धंद्याचे महत्त्व लक्षात घेऊन त्याचा पाया अधिक विस्तृत आणि भक्कम करण्याची फार आवश्यकता आहे. त्यासाठी टी. व्ही. व रेडिओ ह्यांना चैनीच्या वस्तू समजण्याचे बंद झाले पाहिजे.

## कायद्याच्या अधिराज्यासाठी दारिद्र्याचा नाश केला पाहिजे

दिल्ली हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. रंगराजन ह्यांनी बार असोसिएशन ऑफ इंडिया ह्या संघटनेपुढे एक निबंध वाचला. ते म्हणतात की, कायद्याची सत्ता कार्यक्षम आणि परिणामकारक व्हावयाची असेल तर लोकशाही जीवनाने काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. ह्या जीवनपद्धतीने आपल्या भोवतालच्या परिस्थितीतील मोठे दोष नाहीसे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज आपल्या देशात अतीव दारिद्र्याचा आणि त्यापासून निर्माण झालेले लक्षावधी लोकांच्या जीवनातील दैन्य दिसत आहे. ह्या परिस्थितीत समाजवादाच्या सनातनी कल्पनांचा काही उपयोग होणार नाही. सामाजिक सुखाचा मार्ग कोणता आहे, हा खरा प्रश्न आहे. समाजवादाच्या तत्त्वज्ञानाला तत्त्वज्ञान म्हणून कार्यरत व्हावयाचे असेल तर त्याला उत्पादनाच्या तत्त्वज्ञानाचे रूप घ्यावे लागेल. केवळ वाटणीच्या स्वरूपाचे तत्त्वज्ञान चालणार नाही. लोकांना जर असे आढळून आले की त्याच्या सरासरी उत्पन्नात वाढ झाली आहे तर त्यांना उत्पन्नाच्या सरासरी पातळीविषयी फारसे काही वाटणार नाही. तरी सुद्धा उत्पन्नावर मर्यादा घालण्याच्या कल्पनेचा विचार सोडून भागणार नाही. मात्र संपत्तीच्या वाटणीबाबतच्या न्यायान्यायाला पूरक अशा तऱ्हेची ही कल्पना असली पाहिजे.

## वढती कोणाला ?

माननीय श्री. संपादक, ‘ अर्थ ’ पाक्षिक, पुणे, यांना,

स. न. वि. वि.

महाशय,

‘ अर्थ ’ पाक्षिकाचे दि. १५ नोव्हेंबर १९७२ चे अंकातील “ व्यवस्थापनातील समस्या ( १ ) ” या शीर्षकाखालील ‘ बढती कोणाला ? ’ हा मा. श्री. सि. के. पंडीत, एम्. ए., एल एल. बी., ए. सी. ए. यांचा लेख वाचला. लेख खरोखरच अभ्यसनीय व संबंधितांचे व्यवस्थापकीय निर्णयशक्तीस चालना देणारा असल्याने त्याबद्दल लेखक अभिनंदनास पात्र आहेत.

उपरिनिर्दिष्ट लेखामध्ये नमूद करण्यत आलेले श्री. रानडे व व श्री. सातपुते यांचे कामासंबंधीचे त्यांचे वरिष्ठ अधिकारी, श्री. साधले यांनी चाणाक्षपणे दिलेले शेरे विचारांत घेता, त्यांनी श्री. सातपुते यांनाच बढती दिली असावी असे सकृद्दर्शनी वाटते; परंतु व्यवस्थापकीय दृष्ट्या या कृतीचे समर्थन करणे अशक्य असल्याने, त्यांनीं तसा निर्णय नक्कीच घेतला नसणार !

कोणाही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास बढती देताना, सर्वसाधारणपणे त्याच्या कामाचा दर्जा, वक्तशीरपणा, चोखपणा, संस्थेबद्दलची त्याची निष्ठा, त्याने केलेल्या सेवेचा कालावधी, इत्यादि बाबी व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून मुख्य समजल्या जातील. वरिष्ठाचे खाजगी कामात रस घेणे हा वरील आवश्यक गुणांव्यतिरिक्त फार तर जादा गुण मानता येईल; परंतु व्यवस्थापनाचे दृष्टीने, तो महत्त्वाचा मानणे उचित होईलसे वाटत नाही.

वरील लेखातील सर्व तपशील विचारात घेता श्री. साधले यांनी, श्री. रानडे यांची दहा वर्षांची निष्ठापूर्वक चोख सेवा विचारात घेऊन, त्यांनी संस्थेचे प्रमुख अधिकाऱ्यांशी व सहकाऱ्यांशी वागण्यात अधिक सहकार्य व खेळकर वृत्ती ठेवण्याच्या कामी त्यांना अवश्य ते मार्गदर्शन करून त्यांनाच बढती दिली असावी असे वाटते. कारण व्यवस्थापकीय दृष्टीने तोच निर्णय योग्य होईल.

वरील विचारांशी ‘ अर्थ ’ चे माझे वाचकबंधु सहमत होतील काय ?

व्यवस्थापनातील विविध समस्यांसंबंधी ‘ अर्थ ’ चे वाचकांचे बुद्धीस चालना देणारे उत्तेजक लेख प्रसिद्ध करण्यास सुरुवात केल्याबद्दल आपणांस धन्यवाद !

म. कळावे ही वि.

आपला सहकारी,

आर. डी. कुलकर्णी,

बी. ए., जी. डी. सी. अँड ए , एच. पी.

सेक्रेटरी, दि कोपरगाव सहकारी साखरकारखाना लि.

कोळपेवाडी ( अहमदनगर )




## व्यवस्थापनातील समस्या (२)

### नव्या शिक्षणाच्या, ताज्या रक्ताच्या तरुणांची कुचंबणा

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

म. ब्राईट अँड डल कंपनीची व्यवस्थापकीय सूत्रे शेठ चंद्रकांत अगरवाल यांनी हाती घेऊन जवळजवळ वर्ष पुरे होत आले. ब्राईट अँड डल ही कंपनी पूर्वी परदेशी इंस्ट्रुमेंटसूची आयात करीत असे. १९५० साली या कंपनीने स्वतःचा उत्पादन-विभाग त्यांच्या परदेशी कंपनीच्या सहकार्याने सुरू केला. कंपनीच्या भारतीयीकरणांत हा उद्योग भारतीय पार्टनर शेठ जवाहरलाल अगरवाल यांनी ताब्यात घेतला. या कंपनीने २० वर्षांचे काळात विद्युत उपकरणांचे बाबतीत पुष्कळ प्रगती केली व एक दर्जेदार उत्पादक म्हणून नांव मिळवले.

१९७० साली जवाहरलालजींचे चिरंजीव चंद्रकांत अमेरिकेहून इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंग व मॅनेजमेंटचे उच्च शिक्षण घेऊन आले आणि १९७१ पासून ते कंपनीचे कार्यकारी संचालक झाले. अमेरिकन उद्योगांची प्रगती व सुधारणा प्रत्यक्ष अनुभवून आलेल्या चंद्रकांतना स्वतःचे कंपनीत अनेक गोष्टी असमाधानकारक आढळल्या. कंपनीचे नाव व इमेज राखण्यासाठी त्यांना ऑफिसमध्ये, कारखान्यात, अधिकाऱ्यात, सर्वत्र आधुनिकता आणणे आवश्यक वाटले. त्या दृष्टीने त्यांची व प्लँट मॅनेजर श्री. सुरेश दोशी यांची वरचेवर चर्चा होऊ लागली. या चर्चांतून मतैक्य होण्याऐवजी मतभेदच वाढायला लागले. शेठ चंद्रकांत यांचे मते श्री. दोशी यांनी प्रॉडक्शनच्या बारीक सारीक गोष्टीत स्वतः लक्ष घालू नये पण श्री. दोशी म्हणत की जर मी या लहान गोष्टीत प्रत्यक्ष लक्ष घालणे सोडले तर आपल्या उत्पादनाचा दर्जा कायम राहील याची खात्री देता येत नाही.

श्री. दोशी हे जुन्या काळचे डिप्लोमा पास झालेले परंतु ब्राईट अँड डलमध्ये २० वर्षे नोकरी करून शेठ जवाहरलालजींचा विश्वास संपादन करून अॅप्रेंटिसपासून प्लँट मॅनेजरचे हुद्यावर चढले होते. उत्पादनांतील अचूकता हे त्यांचे वैशिष्ट होते. त्यांचे हाताखाली आज पदवीधर इंजिनीयरही काम करीत होते. त्यांना दोशी आपल्या अनुभवाने मार्गदर्शन करू शकत होते. ते इंजिनीयरही दोशी यांच्या हाताखाली विनातक्रार काम करीत व आपल्या पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड देत. परंतु ५।६ वर्षांनी हे अनुभवी इंजिनीयर ब्राईटची नोकरी सोडून दुसरीकडे चांगल्या हुद्यावर जात किंवा स्वतंत्र वर्कशॉप काढून धंदा सुरू करीत.

शेठ चंद्रकांत यांना स्वतःची संस्था स्थिर पायावर व आधुनिक पद्धतीने वाढवायची होती. त्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा ऑर्गनायझेशनमध्ये करायच्या तर त्यांना कंपनीसाठी जनरल मॅनेजर म्हणून अधिक व्यापक अनुभवाचा माणूस हवा होता. श्री. दोशी आपले प्रॉडक्शनचे क्षेत्र सोडून कॉस्टींग, सेल्स, मटेरियल कंट्रोल, वगैरे विषयांत लक्ष घालण्यास उत्सुक नसत. त्यांच्या मते विक्री विभाग, बिले करण्यापुरता व ऑर्डरची नोंदी करण्यापुरता असतो. त्यात अकाऊंटींग शिकलेले कारकूनच बरे. उगाच पोषाखीपणा करणारे व विक्रीच्या निमित्ताने इतर खर्च वाढवणारे आधुनिक सेल्स मॅनेजरांची ब्राईट अँड डलला जरुरी नाही.

या व अशाच मुद्दांवर त्यांची व शेठ चंद्रकांत यांची वादावादी होत असे. शेठ चंद्रकांतांना असे वाटू लागले की श्री. दोशी जोपर्यंत सर्वांत उच्च अधिकाराचे पदावर हुद्याने, पगाराने व सीनियॉरिटीने आहेत तोपर्यंत मला आवश्यक सुधारणा घडवून आणणे कठीण आहे. श्री. दोशींचे वय अवघे ४८ होते. म्हणजे त्यांना निवृत्त करणेही कठीण होते. श्री. दोशींनी वयाचे १८ व्या वर्षापासून, ३० वर्षे स्वतःच्या सुखसोयींची पर्वा न करता, एकनिष्ठपणे कंपनीची सेवा केली आहे. शेठ जवाहरलाल आज कंपनीच्या व्यवहारात प्रत्यक्ष भाग घेत नसले तरी त्यांचे वर्चस्व अजूनही टिकून होते. श्री. दोशींना दुखवणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शेठ जवाहरलालना नाराज करण्यासारखे होते. शेठ चंद्रकांत यांना कंपनीत सुधारणा करणे तर अत्यावश्यक वाटत आहे.

प्राप्त परिस्थितीत शेठ चंद्रकांत व श्री. दोशी यांनी काय करावे ?

---

### प्रत्येक जर्मन नागरिक नंबराने ओळखला जाणार

पश्चिम जर्मनीमधील प्रत्येकाला बारा आकडी एक कोड नंबर दिला जाईल आणि सरकारी व्यवहारात त्या नंबराने तो ओळखला जाईल. १९७५ सालापासून ही व्यवस्था अमलात येईल. एकाच नावाच्या असंख्य व्यक्ती असतात, त्यामुळे कॉम्प्यूटरचा उपयोग करणे कठीण जाते, त्यावर ही उपाययोजना आहे. इस्राएल, नॉर्वे, स्वीडन आणि डेन्मार्क येथे अशी कोड नंबरांची व्यवस्था अमलात आहे. भारतात इन्कमटॅक्स खात्याने करआकारणी झालेल्यांना असे नंबर दिलेले आहेत आणि त्या खात्याकडे पाठविलेल्या प्रत्येक कागदावर हे नंबर लिहावे लागतात, हे माहीत आहेच.

---

**'मारुती' मोटार एप्रिलमध्ये मिळू लागणार** — श्री. संजय गांधी यांची 'मारुती' मोटार एप्रिलमध्ये बाजारात येईल, अशी अपेक्षा आहे. प्रारंभी दररोज चार ते पाच मोटारी तयार होतील; कालांतराने दैनिक उत्पादन २०० वर जाईल. कारखान्यातून बाहेर पडताना तिची किंमत ८,२५० रु. असेल. हरयाणा राज्यात ती ११,३०० रु. ला मिळू शकेल. स्थानिक करानुसार तिची किंमत इतर राज्यांत बदलेल.

## उद्बोधक उद्गार

### ( १ ) वीज कपात केवळ नैसर्गिक कारणांमुळे नव्हे !

" महाराष्ट्रातील वीजकपात केवळ अपुऱ्या पाण्यामुळे म्हणजे नैसर्गिक कारणामुळे ओढवली नसून राज्य सरकारच्या चुकीच्या व कमकुवत धोरणामुळे झाली आहे. गेल्या वर्षी पर्जन्यमान चांगले होते, तरीही वीजकपात का करावी लागली ? कलकत्त्यासारख्या भरपूर पावसाच्या क्षेत्रात वीजकपात का करावी लागते ? पंजाब, उत्तर प्रदेश, आदी जास्त पावसाच्या प्रदेशात वीजकपात का करावी लागली ? याचा विचार करावा लागेल. गेल्या वर्षी महाराष्ट्रातील कमी पर्जन्यमान लक्षात घेता, गेल्या वर्षीपासूनच वीजकपातीचे धोरण हळूहळू अमलात आणावे लागेल अशी सूचना सहा महिन्यांपूर्वीच मी मुख्य मंत्री ना. नाईक ह्यांना पत्र पाठवून केली होती. परंतु माझ्या पत्रानुसार योग्य वेळी दक्षता घेण्यात आली नाही. पॉवर जनरेटर्स करण्यासाठी किर्लोस्कर कंपनीत सध्या ५०० जनरेटर्स तयार करण्याचे काम चालू आहे. किर्लोस्करांना लागणारे सुटे भाग तयार करणाऱ्या छोट्या कारखानदारांना ते प्रथम देण्यात येतील त्यानंतर इतरांना गरजेनुसार पुरविले जातील. "

—श्री. शंतनुराव किर्लोस्कर

---

### ( २ ) रिझर्व्ह बँकेने सरकारला चलनवाढीबाबत इशारा दिला का ?

" नियमाप्रमाणे चलन निर्माण करण्याचे काम रिझर्व्ह बँकेचे आहे परंतु निर्णय घेण्याचे काम सरकारच करीत आहे. ह्या बाबतीत रिझर्व्ह बँक आणि सरकार ह्यांच्यात विचारविनिमय होतच नाही. रिझर्व्ह बँकेने सल्ला देण्याची आपली कामगिरी कितपत पार पाडली आणि हा सल्ला सरकारने कितपत मानला, ह्याच्या चौकशीसाठी एक कमिशन नेमण्यात आले पाहिजे. ठराविक मर्यादेपलीकडे चलनवाढ झाली तर रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा उद्देशच उखडला जाईल. चलनाचा पुरवठा आणि मालाचा पुरवठा ह्यांमधील समतोल पार नाहीसा झाला आहे. "

— श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार
( रिझर्व्ह बँकेचे एक भूतपूर्व गव्हर्नर )

---

### फलटण शुगर वर्क्सचे मलेशियात पदार्पण

भारत–मलेशिया सहकार्याने मलेशियात १५ कोटी रुपयांचा साखर कारखाना उभारण्याच्या बाबतीत करार करण्यात आला आहे. फलटण शुगर वर्क्स कारखान्यात एक कोटी रु. गुंतवील आणि उसाच्या लागवडीच्या बाबतीत आणि साखर-उत्पादनाच्या बाबतीत तांत्रिक सल्ला देईल ह्या प्रकल्पासाठी १५,००० एकरांचे जंगल लागवडीस योग्य केले जाईल. कारखान्याची दैनिक उत्पादनक्षमता २,५०० टन असेल. वालचंदनगर इंडस्ट्रीज ४ कोटी रुपयांची यंत्रसामग्री तयार करून देईल.

---

### बिगर-बँकिंग कंपन्यांना अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारण्याची परवानगी

१ जानेवारी, १९७३ पासून बिगर-बँकिंग कंपन्यांना अल्प मुदतीच्या ठेवी घेण्यास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. आता सहा महिन्यांच्या मुदतीच्या ठेवीही त्यांना घेता येतील. सध्याच्या सीलिंगप्रमाणे त्यांना जेवढ्या रकमेच्या ठेवी घेतात, त्याच्या १०% एवढ्या ठेवी तीन महिने मुदतीच्या असायला हरकत नाही. वसूल भांडवल + मुक्त गंगाजळी ह्याच्या २५% एवढ्या ठेवी घेण्यास फिनॅन्शिअल आणि बिगर-फिनॅन्शिअल कंपन्यांना परवानगी आहे. हे सीलिंग कायम राहील. ठेवी घेणाऱ्या कंपन्यांना ठेवींच्या बाबतीत लवचीकपणा असावा, हा प्रस्तुत सवलतींचा उद्देश आहे; त्यांना मोसमी गरजा भागविणे सोपे जाईल. प्रायव्हेट कंपन्यांनी भागधारकांकडून घेतलेल्या ठेवी " ठेवी " ह्या व्याख्येतून वगळलेल्या आहेत. १ एप्रिल, १९७३ नंतर घेण्यात येणाऱ्या ठेवींच्या अर्जावर कंपनीच्या ठेवींचे जाहिरातीत जो तपशील द्यावा लागतो, तो छापावा लागेल.

---

### ब्रिटिश इमिग्रेशन धोरणाने पत्रकाराला कुडकुडत ठेवले !

श्री. सदाशिव पळसुले हे लंडनमध्ये क्रीडा लेखक आणि क्रीडालेखनविषयक संशोधक म्हणून गेले वर्षभर राहात असत. २३ ऑगस्ट रोजी त्यांनी म्युनिकच्या ऑलिंपिक सामन्यांचे वर्णन लिहिण्यासाठी लंडन सोडले. " तुम्ही परत येण्याला काही अडचण असणार नाही " असे ब्रिटिश होम ऑफिसने त्यांना सांगितले, असे ते म्हणतात. पण १६ ऑक्टोबर रोजी ते डोव्हरला आले तेव्हा त्यांना ब्रिटनमध्ये येण्यास बंदी करण्यात आली, कारण इमिग्रेशन अधिकाऱ्यांच्या मते श्री. पळसुले ह्यांचे लंडनमधील बँकेतील ८७ पौंड त्यांना प्रवेश करू देण्यास पुरेसे नव्हते. डोव्हरला श्री. पळसुले पोचले तेव्हा त्यांच्या खिशात काहीच पैसे नव्हते. भारतीय वकिलातीने त्यांच्या पॅरिसच्या परतीच्या प्रवासाचे भाडे दिले. गेले महिनाभर श्री. पळसुले लंडनला परत जाण्याचा आपला हक्क शाबीत करू पाहात आहेत. मित्र आणि तिनओळखीचे लोक ह्यांच्या उपकारामुळे रोजच्या अन्नासाठी दोन फ्रँक ते खर्च करू शकतात. " आम्हांला दारिद्र्याची सवय असताना, पाश्चात्य समाजाने आमच्यावर वरच्या दर्जाची राहणी लादण्याचा प्रयत्न करणे अयोग्य आहे. कर्मठपणाची आणि स्वेच्छेच्या दारिद्र्याची भारतीय परंपरा फार मोठी आहे; माझ्या देशबांधवांच्या प्रमाणे दारिद्र्याचे जीवन जगण्यात मला आनंदच वाटतो " असे श्री. पळसुले ह्यांनी ब्रिटिश होम ऑफिसला कळविले आहे.

५३ वर्षे वयाचे श्री. पळसुले ह्यांचा २१ वर्षांचा मुलगा मंजु, लंडनमध्ये आहे. तेथेच त्याचे गरम कपडे, टाइपरायटर, लेखनाचे महत्त्वाचे कागद, इत्यादी आहेत. पण पॅरिसमधील ५० सेंटिग्रेड तपमानापेक्षाही थंड हवेत त्यांना आज कुडकुडावे लागत आहे !

## इतिहासाचे अज्ञात पान की राजकीय थापा !

पाकिस्तानचे अध्यक्ष भुत्तो वादपटू म्हणून प्रसिद्ध आहेत. राजकारणातील त्यांच्या उलट्यासुलट्या उड्या सर्वांच्या परिचयाच्या झाल्या आहेत. तरीपण मधून मधून काहीतरी खळबळजनक वक्तव्य करण्याची त्यांची खोड कौतुकास्पदच म्हटली पाहिजे. 'दि पाकिस्तान टाइम्स' ह्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या माहितीप्रमाणे भुत्तोंनी अशी माहिती सांगितली की भारताचे पहिले गृहमंत्री सरदार पटेल ह्यांनी जुनागढ आणि हैदराबाद संस्थानच्या अदलाबदलीत काश्मीर पाकिस्तानला देऊ केला होता. पण, पाकिस्तानने ह्या गोष्टीला नकार दिला. भुत्तो म्हणतात की परिणामी पाकिस्तानला जुनागढ, हैद्राबाद व काश्मीर तर सोडावे लागलेच; अर्धे पाकिस्तानही गमवावे लागले. श्री. भुत्तो ह्यांनी फाळणीच्या इतिहासातील एक अज्ञात पान प्रकाशात आणले आहे की ही माहिती म्हणजे राजकीय थापेबाजीचा एक प्रकार आहे, हे सांगणे कठीण आहे. पाकिस्तानच्या भूगोलाबद्दल मात्र त्यांना झालेली जाणीव उशिराची असली तरी खरी आहे. ते म्हणतात की पूर्व पाकिस्तान बाकीच्या एकसंघ पाकिस्तानपासून १ हजार मैल अलग होते, तरी सुद्धा ते २५ वर्षे पाकिस्तानात नांदले. इतिहासात अशा प्रकारची उदाहरणे फारशी नाहीतच. दुसरे उदाहरण अलास्काचे आहे. अलास्का अमेरिकेपासून शेकडो मैल दूर आहे. त्याचा विकास करण्यासाठी अमेरिका खूप मोठा खर्च करीत आहे. पाकिस्तानजवळ अमेरिकेसारखा अफाट पैसा असता तर पाकिस्तानलाही पूर्व पाकिस्तान आपल्या सीमेत ठेवता आले असते. राजकीय घोडचुकांमुळे पाकिस्तानने पूर्व पाकिस्तान गमावले ह्यात शंकाच नाही.

---

## नियोजनमंत्री श्री. धर गोष्ट सांगतात

भारताचे नियोजनमंत्री श्री. डी. पी. धर पुण्यात आले असताना एका प्रसंगी त्यांनी एक गोष्ट सांगितली. ते सांगतात, "एका राजाच्या पदरी एक न्हावी होता. त्याच्याजवळ तीन चारशे रुपयांची माया होती. राजा मधून मधून त्याच्याजवळ प्रजेच्या ख्यालीखुशालीची वार्ता पुसत असे. दर वेळी नापिकाचे उत्तर ठरलेले असे. तो म्हणे, 'सरकार, प्रजा आनंदात आहे. तिला पोटभर खाण्यापिण्यास मिळत आहे.' पण एकदा राज्यात दुष्काळ पडला असताना सुद्धा त्याच्या उत्तरात काहीच फरक पडला नाही. ह्या परिस्थितीची राजाच्या दिवाणाला फार चिंता वाटू लागली. एवढा मोठा दुष्काळ पडला असतानाही न्हावी राजाला काहीच खरे सांगत नाही ह्याबद्दल त्यांना काळजी वाटू लागली. ह्याचे परिणाम चांगले होणार नाहीत असे त्यांना वाटू लागले. मग त्यांनी एक युक्ती केली. त्यांनी न्हाव्याजवळची थोडीशी माया काढून घेतली. दुसऱ्याच दिवशी एक चमत्कार घडून आला. न्हावी राजाला सांगू लागला 'काय सांगावे सरकार! परिस्थिती अतिशय वाईट आहे. लोकांची अन्नान्नदशा झाली असून त्यांची पोटे सपाटी गेली आहेत.' गोष्ट सांगून झाल्यावर श्री. धर म्हणाले की देशात काही लोक भीषण काल पुढे असल्याचे ढोल बडवीत आहेत. पण त्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे. जवळचे पैसे खुळखुळवीतच हे लोक देशात निराशेचे वातावरण निर्माण करीत आहेत. देश संकटाच्या मोठ्या खाईत कोरपळत आहे, असा आक्रोश ते करीत आहेत. समाजातील काही वर्गांजवळ भरपूर पैसा असून त्यांना आपल्याजवळील धनाबद्दल चिंता वाटत आहे असा त्यांच्या आक्रोशाचा अर्थ करता येईल.

---

## टेलिव्हिजनच्या किमती हळूहळू उतरणार

ऑल इंडिया रेडिओ अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन ही संघटना मद्रास येथे एक इलेक्ट्रॉनिक्सचे प्रदर्शन भरविणार आहे. प्रदर्शन २ फेब्रुवारी, १९७३ पासून २६ तारखेपर्यंत चालणार आहे. रेडिओ आणि इलेक्ट्रॉनिक्स परिषदेच्या ५ व्या वर्षदिनानिमित्त ते भरविण्यात येत आहे. परिषदेची बैठक ४ दिवस चालणार असून तीसाठी सर्व देशांतून ५०० च्या वर प्रतिनिधी हजर राहतील असा अंदाज करण्यात आला आहे. परिषदेच्या प्रवक्त्यांनी वार्ताहरांशी बोलताना असे सांगितले की रेडिओच्या किमती जशा हळूहळू खाली आल्या त्याचप्रमाणे टेलिव्हिजनच्या किमतीही येत्या तीन-चार वर्षांत खाली आणण्यात येतील. सध्या त्या बहुसंख्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर आहेत. भारत इलेक्ट्रॉनिक्स लि. ह्या कारखान्यात टेलिव्हिजनला लागणारा एक भाग १९७४-७५ पासून उत्पादन करण्यात येईल. मग १२ इंची टेलिव्हिजन पडद्याची किंमत १ हजार रुपयांपर्यंत उतरविता येणे शक्य होईल. सध्या देशात टेलिव्हिजनचे उत्पादन दरसाल सुमारे ६० हजार इतके होत आहे. परंतु १९७३-७४ च्या सुमारास त्याचे उत्पादन २० लाखांपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे. भारत रेडिओ आणि टेपरेकॉर्डर्स ह्यांची निर्यात करतो. सरकारने जर नव्या बाजारपेठा मिळवून देण्याच्या कामी मदत केली तर त्यांची निर्यात खूप वाढविता येण्यासारखी आहे. सध्या ह्या मालाच्या निर्यातीला मर्यादा पडल्या आहेत. भारताचा माल हल्ली सुदान आणि इजिप्त ह्या दोनच देशांना निर्यात होतो. ह्या देशांतील बाजारपेठ आता विस्तार पावण्यासारखी राहिलेली नाही. कारण येथे भरपूर निर्यात झालेली आहे.

---

७९% कुटुंबांना प्रत्येकी एकच खोली— मुंबईमधील ७९·२% कुटुंबांच्या वाट्याला प्रत्येकी एकच खोली येते. १२·९% कुटुंबे दोन खोल्यांच्या बिऱ्हाडात राहतात, ५·१% कुटुंबे तीन खोल्यांच्या बिऱ्हाडात राहतात आणि २·८ कुटुंबांकडे चार किंवा अधिक खोल्या आहेत.

आलिगडची कुलपे झेकोस्लोव्हाकियाकडे —अलिगडच्या एका फर्मला २५ लक्ष रुपयांच्या कुलुपांची ऑर्डर झेकोस्लोव्हाकियाकडून मिळाली आहे.

## इटलीमध्येही नाण्यांच्या मोडीची टंचाई

इटलीमध्ये छोट्या नाण्यांची टंचाई पडल्याने नागरिकांना बरीच गैरसोय सोसावी लागत आहे. तेथे १० लिराचे नाणे व्यवहारातून अदृश्य होत चालले आहे. त्यामुळे इटलीच्या अर्थ-खात्याला चिंता वाटू लागली आहे. हे नाणे तसे अगदी हलके असून अल्युनियमचे बनविलेले आहे. नाणे म्हणून त्याची दर्शनी किंमत नगण्य म्हणावी लागेल. पण इटलीतील जे लोक उंच उंच इमारतीमधील जागांत राहातात त्यांना लिफ्टचा वापर करण्यासाठी ती नेहमीच लागतात. ह्या नाण्यांची टंचाई अलीकडे इतकी वाढली आहे की मद्यगृहे आणि पत्रविक्रेते ह्या नाण्यांच्या ऐवजी गिऱ्हाइकांना गोड पदार्थांच्या गोळ्या देऊ लागले आहेत. टंचाईचे कारण नक्की सांगता येत नाही. परंतु इटलीतील गृहिणी पोशाखातील बटनाच्या मागे लावण्यासाठी त्यांचा उपयोग करतात असे सांगण्यात येते.

---

## ब्रिटनमधील हायकमिशनचा खर्च

भारताच्या ब्रिटनमधील हाय कमिशनचा खर्च फार मोठा असल्याची तक्रार तशी जुनीच आहे. परराष्ट्रीय खात्याने ह्या खर्चात खूप मोठी कपात केल्याचे अलीकडे जाहीर केले आहे. परंतु लोकसभेत उपपरराष्ट्रमंत्री श्री. सुरेंद्र पाल सिंग ह्यांनी सांगितलेल्या माहितीवरून खर्चातील कपात म्हणण्यासारखी झालेली नाही, असे दिसते. भारत अनेक परदेशांत निरनिराळ्या दर्जाचे राजप्रतिनिधी ठेवतो. त्या सर्वांवर मिळून जेवढा खर्च दरसाल करण्यात येतो त्याच्या एकपंचमांश हिस्सा खर्च ब्रिटन-मधील हायकमिशनवर करण्यात येतो. हायकमिशनच्या वार्षिक खर्चाची रक्कम २॥ कोटी रुपयांच्या घरात जाते. परराष्ट्रखात्याशी संबंधित अशा एकूण ११७ इतर कचेऱ्या परदेशांतून आहेत. त्यांच्यावर दरसाल १० कोटी रुपये खर्च करण्यात येतात.


---

## स्त्रीद्वेष्ट्या (?) गणकयंत्राचे रहस्य

रशियातील नोव्होसिबिर्क ह्या शहरात काही गणिती आपल्या कामात गणकयंत्राचा उपयोग करीत होते. त्यांना ह्या यंत्राच्या वर्तणुकीत चमत्कारिक अनुभव येऊ लागला. गणक-यंत्रापुढे उत्तरासाठी जे गणिती प्रश्न टाकण्यात येतात त्यांची उत्तरे नेहमीच बिनचूक येतात. परंतु हे प्रश्न जर पुरुष गणितज्ञांनी टाकलेले असतील तरच त्यांची उत्तरे बरोबर येत. स्त्री गणितज्ञाने उत्तरासाठी टाकलेल्या प्रश्नांची उत्तरे हास्यास्पद येऊ लागली. ह्या चमत्कारिक प्रकारामुळे शास्त्रज्ञ गोंधळून गेले. अखेर असे आढळून आले की स्त्रियांच्या पोषाखात जर काही कृत्रिम धाग्यांचा वापर करण्यात आला असेल तर त्यामुळे त्यांच्या भोवती चुंबकीय क्षेत्र उत्पन्न होते आणि त्याचा परिणाम गणक-यंत्रावर होतो; गणकयंत्र काही स्त्रीद्वेष्टे नव्हते.

---


IMPORT SUBSTITUTE
GADRE KEYS



ALL TYPES AS PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना
निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना
डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक
महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

# भारतात गणक यंत्रांच्या वापरास प्रारंभ

( लेखक : सुभाष रेळे )

इतर सर्व पुढारलेल्या देशांप्रमाणेच आता भारतातही विविध कामासाठी गणकयंत्रांचा उपयोग, अल्प प्रमाणावर का होईना, पण होऊ लागला आहे. जसजसे आपल्या व्यवहारांचे व प्रश्नांचे स्वरूप प्रचंड आणि गुंतागुंतीचे होत जाईल तसतशी त्यांची उरक झपाट्याने आणि कार्यक्षमतेने होण्यासाठी, या यंत्राची गरज वाढणार आहे यात शंका नाही.

भारतात वैज्ञानिक जगतास आणि सरकारी संघटनास गणकयंत्राचा परिचय करून देण्याचे श्रेय मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेकडे जाते. या संस्थेने १९६३–६४ मध्ये भारतात पहिल्यांदाच डिजिटल कॉम्प्यूटर बसविला. या यंत्राच्या सहाय्याने वैज्ञानिकांना आणि इंजिनियरांना संशोधन कार्यातील गणन विषयक अवघड प्रमेये सोडविण्यास मदत होऊ लागली. परंतु व्यापारी कार्यासाठी गणकयंत्राचा उपयोग करण्याचा मान एसो स्टॅण्डर्ड ईस्टर्न इन्कॉर्पोरेटेड या कंपनीचा आहे. या कंपनीने १९६१ मध्ये आपल्या कामासाठी गणकयंत्रे वापरण्यास सुरवात केली. त्यानंतर बर्मा शेल आणि कॅल्टेक्स या परदेशीय कंपन्यांनी १९६६–६७ मध्ये एसोचे अनुकरण केले. तेव्हापासून भारतात गणकयंत्रांचा वापर हळूहळू वाढत आहे. आज वाहतूक, संशोधन आणि शैक्षणिक संस्था, संरक्षण, इत्यादी क्षेत्रात, तसेच लोखंड आणि पोलाद, मोटारी, पेट्रोलियम, रसायने, पेट्रो-रसायने आणि कापडगिरण्या, इत्यादी उद्योगात गणक-यंत्रे वापरात आली आहेत.

### खर्चात बचत

गणकयंत्रामुळे भारतातील पोलाद आणि तेल शुद्धीकरण कारखान्यातील अनेक क्रिया आधुनिक धर्तीने होण्यास मदत झाली आहे. गणयंत्राच्या साहाय्याने आपणापाशी कोणत्या मालाचा किती साठा आहे ते क्षणार्धात समजणे शक्य असते. हे सामुग्री साठ्याचे नियंत्रण करण्याचे काम टेल्को कंपनीने आपल्या कारखान्यात सुरू केल्यानंतर, कच्च्या आणि अर्धपक्क्या मालाचा साठा कमी प्रमाणात ठेवून काम भागू लागले आणि परिणामी साठ्यापायी अडकून पडणाऱ्या रकमेत ५ कोटी रुपयांची बचत झाली. रेल्वेनीही अशाच प्रकारे आपल्या सामग्री साठ्याचे नियंत्रण गणकयंत्रावर सोपविल्यामुळे सुमारे ११ कोटी रुपयांची बचत होऊ लागली. गणकयंत्रामुळे होणारा हा लाभ लक्षात घेऊन आज दुर्गापूर येथील मध्यवर्ती यांत्रिक इंजिनिअरिंग संशोधन संस्था त्याचप्रमाणे कानपूर, दिल्ली, मुंबई आणि मद्रास येथील भारतीय तंत्रविज्ञान संस्था यामध्ये इंजिनिअरिंग विषयक संशोधनासाठी इलेक्ट्रॉनिक गणकयंत्रे वापरली जाऊ लागली आहेत. शेतकी संशोधन संस्थातून आणि शेत की विद्यापिठातूनही त्यांचा वापर हल्ली करण्यात येतो.

या संस्थांनी शोधून काढलेल्या कल्याण सोना सारख्या अमाप पीक देणाऱ्या गव्हाच्या जाती निर्माण करण्याच्या कामात गणकयंत्राचा खूप उपयोग झाला आहे. निरनिराळ्या पिकांच्या बाबतीत आणि बियाण्यांच्या संशोधनातही त्यांची मदत होते. धान्योत्पादन वाढ, पिकावरील रोगांचा बंदोबस्त आणि दुग्धोत्पादनाचे प्रमाण वाढविणे या कामातही शेतकी संशोधक गणकयंत्राची मदत घेतात.

### संशोधनाला मदत

जंगल संशोधन संस्थेच्या कार्यातही गणकयंत्राचा उपयोग होतो. जंगलांची जपणूक, त्यांची वाढ, जंगल संपत्तीचा उपयोग, औषधी वनस्पतींचे संशोधन, कागद उत्पादनासाठी योग्य वनस्पती व साहित्य शोधून काढणे, इत्यादी अनेकविध योजनात जंगल संशोधन संस्थेने गणकयंत्राची मदत घेतली आहे. खनिज संपत्तीचा शोध, आयात मालाऐवजी देशी पर्यायी वस्तूंचा वापर, कमी खर्चात घर, पूल इत्यादी बांधकाम पार पाडणे, या सारख्या कामासाठी संशोधन कार्यकर्ते गणकयंत्राची सेवा घेतात. भारतीय विद्यापीठातून किचकट व अवघड गणन समस्या गणकयंत्राकडे सोपविण्यात येऊ लागल्यामुळे संशोधकांना आणि वैज्ञानिकांना निव्वळ संशोधनाकडे अधिक लक्ष पुरविणे शक्य झाले आहे. टेलिफोन खात्यानेही आपल्या बिलांच्यासाठी गणकयंत्रे वापरात आणल्यामुळे थकबाकी वसूल करण्यात आणि वेळेवर बिले पाठविण्यात बराच उपयोग झाला असून वर्षभरात काही कोटी रुपयांनी त्या खात्याचे उत्पन्न वाढले आहे. उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी नियोजन मंडळही गणकयंत्राची मदत घेऊ लागले आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास अधिक बिनचूकपणे करणे शक्य होणार आहे.

लोकवस्तीविषयक व संख्याविषयक प्रशिक्षण केंद्राला लोकशास्त्रविषयक अभ्यासासाठी देखील गणकयंत्राचा होतो. भरमसाट लोकसंख्यावाढीचा महाभयंकर प्रश्न आपल्या देशापुढे उभा असतानाच्या या काळात एतद्विषयक संशोधनाला किती महत्व आहे हे वेगळे सांगायला नको. थोडक्यात सांगावयाचे तर मानवी व्यवहाराचे असे एकही क्षेत्र नाही की जेथे गणकयंत्राचा उपयोग फायदेशीरपणे करून घेता येणार नाही.

### भारतातील गणकयंत्रांची संख्या

आज आपल्या देशात वरील विविध क्षेत्रात मिळून एकूण १९८ गणकयंत्रे वापरात आहेत.

## लोकसंख्येची वाढ खुंटविण्यात चीन यशस्वी

चीन हा देश आता ५ बड्या राष्ट्रांत मोडू लागला आहे. अर्थातच तेथील घडामोडी जगावर परिणाम करणाऱ्या ठरू लागल्या आहेत. चीनची वाढती लोकसंख्या जगाला धोकादायक ठरण्याचा संभव अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केलेला आहे. खुद्द चीन-मधील राज्यकर्त्यांनाही ह्या प्रश्नाचे गांभीर्य समजलेले असल्याने त्यांनी लोकसंख्येची वाढ खुंटविण्याचे जोराचे प्रयत्न चालविले होते व आहेत. काही वर्षांपूर्वी चीनमधील लोकसंख्येच्या वाढीचा भयानक स्फोट होईल अशी भाकिते चिनी आणि परदेशीय तज्ज्ञांनीही वर्तविली होती. त्यांच्या अंदाजाप्रमाणे १९८० च्या सुमारास चीनची लोकसंख्या १०० कोटीच्या घरात जाणार होती. परंतु चीनच्या सरकारच्या लोकसंख्या रोखण्याच्या प्रयत्नांना यश येऊ लागल्याची चिन्हे दिसत आहेत. चीन-मधील बहुसंख्य लोकांचा ह्या प्रयत्नांना पाठिंबा दिसून येतो. त्यातल्या त्यात प्रजननाचे वय असलेल्या जोडप्यांचा फार जोराचा पाठिंबा आहे. चिनी सरकारचे प्रयत्न व प्रचार घरोघरी पोचविण्याचे काम असंख्य लोक करीत आहे. हे कार्यकर्ते घरोघरी जाऊन लोकांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून देत आहेत. कचेऱ्या, कारखाने, शेतवाड्या, इत्यादी ठिकाणेही त्यांच्या प्रचाराच्या क्षेत्रातून सुटलेली नाहीत आणि ह्या सर्वांचा परिणाम आता दिसू लागत आहे. त्यातही शहरात कुटुंबनियोजनाच्या मोहिमेला अधिक प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण भागात मात्र मोहिम तितकीशी यशस्वी होत नाही असे दिसते. मोठी कुटुंबे अस्तित्वात आणण्याची परंपरा ग्रामीण भागात अजूनही दिसून येते. पण वयस्कर लोकांचाच त्याला पाठिंबा आहे. ग्रामीण भागातील नवयुवक मात्र परंपरा सोडून छोटी कुटुंबे राखण्यास अधिकाधिक प्रमाणात उत्सुक होत आहेत.

## इराणच्या चलनी नोटांना हिंदी जवाहिराचे तारण

इराणच्या सरकारने नवा बँकिंगचा कायदा जाहीर केला आहे. नव्या कायद्याप्रमाणे इराणच्या चलनी नोटांना जवाहिराचे तारण देण्यात येणार आहे. ह्या रत्नांपैकी बहुतेक रत्ने १७३९ साली नादीरशहाने भारतावर स्वारी केली त्या वेळी लुटून नेलेली असून सध्या ती इराणच्या शहाच्या जामदारखान्याची मालमत्ता समजली जाते. ह्या अमोल रत्नांची व जडजवाहिरांची किंमत करणे फार अवघड गोष्ट समजली जाते. सध्या त्यांची किंमत रत्नपारखी ६१ कोटी डॉलर्स इतकी करीत असले तरी १९६९ साली त्यांचीच किंमत ४९ कोटी डॉलर्स करण्यात आलेली होती. अर्थात अशा मूल्यमापनाचा व बाजारातील किमतीचा कधीच मेळ बसत नसतो. इराणच्या १९६० च्या बँकिंग कायद्याप्रमाणे चलनी नोटांना ४० टक्के तारण परदेशीय चलन आणि सोने ह्यांचे असे. आता ह्या तारणाचे प्रमाण २४ टक्के इतके कमी करण्यात आलेले आहे. ह्या पूर्वी बादशाही रत्नभांडाराचे तारण ६० टक्के असे. आता ह्याच तारणाची किंमत ७५ टक्के धरण्यात येत आहे. ह्या सर्व कागदी हिशेबांचा इराणच्या अर्थव्यवस्थेशी कसा व कोणता संबंध असावा ते कळणे कठीण आहे. परंतु अलीकडे इराण आपले आरमार मोठ्या प्रमाणावर वाढविण्याच्या खटपटीत आहे. ह्या संदर्भात इराणच्या मध्यवर्ती बँकेने १३ कोटी डॉलर्सचे परदेशीय चलन मुक्त परदेशीय चलनखाती वर्ग केलेले आहे ही गोष्ट सूचक मानावी लागेल. इराण व पाकिस्तान ह्यांच्या आरमाराच्या संयुक्त कवायतीही अलीकडेच झाल्या आहेत. हिंदी महासागर शांततेचा विभाग ठेवण्याच्या भारताच्या खटपटीला शह उत्पन्न होत असल्याची शंका उत्पन्न झाली आहे.

## परदेशीय शस्त्रवैद्यांवर निर्बंध

मुंबईसारख्या मोठ्या शहरात देशोदेशींचे कुशल शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर्स येतात. त्यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा फायदा घेऊन अनेक हिंदी लोक व्याधिमुक्त होतात. भारत सरकारने आता असा आदेश दिला आहे की परदेशी शस्त्रवैद्यांना भारता-मधील रोग्यांवर शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. भारतामधील हिंदी शस्त्रविशारदांनी अशी तक्रार केली होती की परदेशी डॉक्टर्स भारतात आले म्हणजे समाजातील धनिक रोगी उपचारासाठी त्यांच्याकडे धाव घेतात. त्याचा परिणाम स्थानिक शस्त्रविशारदांच्या प्राप्तीवर होतो. ब्रिटनमधील नेत्र शल्यविशारदांची एक तुकडी नुकतीच भारतात आली होती. तिचे नेतृत्व डॉ. हिंगोराणी ह्यांच्याकडे होते. तुकडीच्या सत्कारप्रसंगी डॉ. हिंगोराणी ह्यांनी वरील बातमी सांगितली.

## बांगला देशात रोज १० हजार मुले जन्मतात

बांगला देशात रोज १० हजार मुले जन्माला येतात. त्या देशाची लोकसंख्या दरसाल ३·५ टक्क्यांनी वाढत असून आणखी वीस वर्षांत ती सध्याच्या दुप्पट होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बांगला देशात २·४७ कोटी लोक काम करण्यास समर्थ असे आहेत. ८० लाख लोक बेकार आहेत. देशातील साक्षरतेचे प्रमाण १६ टक्के आहे. ढाका येथे राष्ट्रीय पातळीवर कुटुंबनियोजन संघटनेचे ५ वे अधिवेशन नुकतेच भरविण्यात आले होते. लोकसंख्येबाबत विविध प्रकारची माहिती त्यात जमविण्यात आली. लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्यासाठी अधिवेशनाला आलेल्या बहुतेक प्रतिनिधींनी भ्रूणहत्या कायदेशीर करावी असे सुचविले. काही जणांनी असे सुचविले की पहिल्या मुलानंतर भ्रूणहत्या करण्यास सरसहा परवानगी देण्यात यावी.

**आगगाड्यांतील दुसरा वर्ग रद्द**— आगगाड्यांतील दुसरा वर्ग रद्द करण्याचे रेल्वेजनी ठरविले आहे. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांचे रूपांतर दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत केले जाईल. वर्कशॉप-मध्ये दुसऱ्या वर्गाचे डबे दुरुस्तीला गेले म्हणजे ते तिसऱ्या वर्गाचे बनून बाहेर पडतील. सर्व डब्यांचे रूपांतर पुरे होण्यास १२ ते १८ महिने लागतील.

## शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत भारतही उतरला

संरक्षण-उत्पादनाच्या खात्याचे राज्यमंत्री श्री. शुक्ल ह्यांनी अशी माहिती सांगितली आहे की, शस्त्रास्त्रे आणि त्यांना लागणारा दारूगोळा ह्यांच्या निर्यातीत आता भारतही सामील झाला असून भारताला ६·५ कोटी रुपये किमतीच्या मालाच्या मागण्याही मिळाल्या आहेत. इटारसी येथे शस्त्रास्त्रांची चाचणी घेण्याचे केंद्र स्थापन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन करताना श्री. शुक्ल म्हणाले की केंद्राच्या स्थापनेसाठी ३·५ कोटी रुपये खर्च आला आहे. संरक्षण खात्यासाठी लागणारे उत्पादन जोरात चालू रहावे म्हणून भारत ह्या व्यापारात भाग घेऊ लागला आहे तथापि, भारतात तयार झालेली शस्त्रास्त्रे आणि संबंधित सामग्री भारताशी मित्रत्वाचे नाते असणाऱ्या देशांनाच फक्त निर्यात करण्यात येणार आहे. भारताच्या लष्कराला पुरविण्यात येणारी शस्त्रास्त्रे कार्यक्षम असली तरच लष्कराला आपले काम नीट पार पाडता येईल हे उघड आहे. म्हणूनच शस्त्रास्त्रांची कार्यक्षमता अजमावण्यासाठी त्यांची प्रत्यक्ष चाचणी घेणे आवश्यक ठरते. आता स्थापन केलेल्या चाचणी केंद्राने ७,८०० हेक्टर भूमि व्यापली असून त्या ठिकाणी सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांची चाचणी करण्याची सोय आहे. येथील केंद्रात दरमहा १० हजार गोळीबारांच्या फैऱ्यांची चाचणी घेण्याची व्यवस्था आहे. त्यात हळूहळू वाढ करण्यात येऊन ३०,००० फैऱ्यांची चाचणी करता येऊ लागेल. इटारसी येथील केंद्रात उडविण्यात येणाऱ्या दारूगोळ्याचा वेग, त्याचा दाब, उद्दिष्ट गाठण्यासाठी लागणारा वेळ, इत्यादी अनेक बाबींची तपासणी करता येते

---

## परदेशांच्या कर्जाच्या परतफेडीचा बोजा

गेल्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस भारत सरकारला परदेशाकडून घेतलेल्या कर्जापैकी ६७० कोटी रुपयांची फेड करावयाची होती. ह्या परदेशी ऋणकोत ६ देशांचा समावेश आहे. मात्र ह्या आकड्यात पी. एल. ४८० मदत कायद्याप्रमाणे घेण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीचा समावेश नाही. ६७० कोटी पैकी सर्वांत जास्त म्हणजे ३५७ कोटी रुपये रशिआला परत करावयाचे होते. त्यानंतर अमेरिकेला २३७ कोटी रुपये द्यावयाचे होते. झेकोस्लोव्हाकिआला ४८·७८ कोटी आणि पोलंडला १९·३० कोटी रुपये परत करावयाचे होते. डेन्मार्कला फक्त ४० लाख रुपये द्यावयाचे होते. ह्या आकड्यावरून रशिआ आणि पूर्व युरोपातील देश ह्यांच्याशी भारताचे आर्थिक संबंध वाढत चालल्याचे स्पष्ट दिसून येते.

---

**दर माणशी उत्पन्नात भारत १०२ वा**— दर माणशी वार्षिक उत्पन्नाच्या दृष्टीने भारताचा १२२ देशांत १०२ वा अनुक्रम लागतो. अमेरिकेचा अनुक्रम पहिला आहे. (२५,७०० रु.)

## जुळ्या मुंबईची योजना रद्द करण्याची मागणी

पुण्यातील शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयातर्फे दि. ९ जुलै १९७२ रोजी 'जुळी मुंबई' ह्या विषयावर चर्चा-शिबीर आयोजित करण्यात आले होते. चर्चा शिबिरामध्ये विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सर्वोदय कार्यकर्ते, सिडकोचे प्रतिनिधी, प्राध्यापक, तंत्रज्ञ व विचारवंत यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी प्रा. वि म. दांडेकर होते. 'जुळी मुंबई' प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य समस्यांचा ऊहापोह करणारे निबंध चर्चा–शिबिरात सादर करण्यात आले आणि त्यावर उद्बोधक खुली चर्चा झाली.

ह्या चर्चा–शिबिरामध्ये झालेल्या विचारमंथनातून 'जुळी मुंबई' प्रकल्पाचा फेरविचार करणे अत्यंत अगत्याचे आहे असा निष्कर्ष निघाला. त्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे महाराष्ट्रातील विचारवंतांनी एक निवेदन पाठवावे असे वाटल्यावरून तसे निवेदन तयार करण्यात आले. त्यावर मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ आणि मराठवाडा विद्यापीठातील ५३ प्राध्यापकांनी स्वाक्षरी केलेली आहे.

### विचारवंतांचे निवेदन

'जुळ्या मुंबईच्या योजनेमुळे आजच्या मुंबईतील जनतेला भोगाव्या लागणाऱ्या घरटंचाई, पाणी-टंचाई, वाहतुकीच्या अडचणी, इत्यादी गैरसोयी कमी होणार नाहीत. जुळ्या मुंबईमुळे कारखानदारी अधिक आकृष्ट होऊन तिचे तिथे अधिकच केंद्रीकरण होईल आणि त्यामुळे आणखी प्रश्न निर्माण होतील. एकंदर महाराष्ट्राच्या व देशाच्या समतोल अर्थविकासाला जुळ्या मुंबईमुळे चालना मिळणार नाही; उलट अडथळाच होईल. युद्धकाळात संरक्षणाच्या दृष्टीनेही जुळी मुंबई जास्त धोक्याची होईल. या व इतर कारणांस्तव जुळ्या मुंबईची योजना रद्द करावी आणि सध्याच्या मुंबईतील जनतेचे प्रश्न तातडीने सोडविण्याचा प्रयत्न व्हावा. सध्याच्या मुंबईतील दाटी कमी करण्यासाठी मुंबई मेट्रोपॉलिटन रीजनचा उपयोग करावा आणि मुंबईत व मुंबई मेट्रोपॉलिटन रीजनमध्ये नवे कारखाने, कचेऱ्या यांची वाढ होऊ देऊ नये. अशा तऱ्हेची नवी वाढ अविकसित विभागातून करण्याचे धोरण नेटाने स्वीकारावे. जुळ्या मुंबईच्या योजनेसंबंधीची ही आमची भूमिका स्वीकारावी अशी ही जाहीर विनंती आम्ही संबंधित अधिकारी व शासन यांना करीत आहोत.

---

**सरकारी इस्पितळे–दवाखान्यांच्या सुट्या**—ह्या सुट्या १९७३ मध्ये खालीलप्रमाणे असतील:— प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी, होळी १९ मार्च, गुढीपाडवा ४ एप्रिल, स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट, नारळी पौर्णिमा १३ ऑगस्ट, जन्माष्टमी २२ ऑगस्ट, गणेशचतुर्थी ३१ ऑगस्ट, दसरा ६ ऑक्टोबर, दिवाळी २७ ऑक्टोबर आणि नाताळ २५ ऑक्टोबर

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी

दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

बी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड


मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | | |
|---|---|---|
| भांडवल व निधी | रु. | ११ कोटी |
| ठेवी | रु. | १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. | १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. | १०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : १३२

तार : IVwpijoay



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८११ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )